अतितत्वर

अति. महापालिका आयुक्त(ज) यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा. क्र. : अतिमआ(ज)/उआ(साप्र)/आस्था/ २९८६
दिनांक : १८/०७/२०१६

## बैठकीचे इतिवृत्त

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील उप अभियंता, शाखा अभियंता (स्थापत्य/विद्युत) या पदावरील अधिकारी/ सेवक यांचे बदल्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली महापालिका आयुक्त यांचे दालनात बुधवार, दि.१३/०७/२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)

२. श्री.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

३. श्री. विलास कानडे, सह आयुक्त (परिमंडळ क्र. ३)

४. श्री. सुनिल केसरी, उप आयुक्त (परिमंडळ क्र. १)

५. श्री. विजय कुलकर्णी, मुख्य अभियंता (पाणी पुरवठा विभाग)

६. श्री. मदन आढारी, अधिक्षक अभियंता (पाणी पुरवठा विभाग)

७. श्री. अनिरुध्द पावसकर, अधिक्षक अभियंता (बांधकाम विभाग)

८. श्री. नितीन उदास, महापालिका सहाय्यक आयुक्त, घोले रोड क्षेत्रिय कार्यालय

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील उप अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य/विद्युत) या पदावरील सेवकांच्या मा. मुख्य सभेच्या बदली धोरणानुसार यापूर्वी वेळोवेळी तसेच माहे जुन व जुलै २०१६ मध्ये बदल्या करण्यात आलेल्या आहेत. बांधकाम विभाग, पथ विभाग, पाणी पुरवठा विभागामधून विविध क्षेत्रिय कार्यालयाकडे कामकाजासाठी उप अभियंता / शाखा अभियंता या पदावरील सेवकांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तथापि संबंधीत खातेप्रमुख यांनी सदर बदली झालेल्या सेवकांना कार्यमुक्त केले नाही. (उप अभियंता या पदावरील श्री. बिपीन शिंदे, श्री. हेमंत मोरे, श्री. भांगरे, श्री. गोंडाणे,

श्री.गांगुर्डे, श्री.नाथा चव्हाण तसेच शाखा अभियंता या पदावरील श्री. उतळे, श्री. उगले, श्री. गायकवाड संजय व कनिष्ठ अभियंता या पदावरील श्री.झुळूक अशोक व शिंदे सागर) त्यामुळे क्षेत्रिय कार्यालयाकडील कामकाजामध्ये अडचणी निर्माण झालेबाबत श्री. सुनिल केसरी, उप आयुक्त (परिमंडळ क्र.१) यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

उप अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य/विद्युत) या पदावरील बदली करण्यात आलेल्या सर्व सेवकांना संबंधित खातेप्रमुख यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे व त्याबाबतचा अहवाल उप आयुक्त (सामान्य प्रशासन) आस्थापना विभाग यांजकडेस दि.१५/०७/२०१६ अखेरपर्यंत सादर करावा. जे सेवक बदली खात्यात हजर होणार नाहीत, त्यांचे माहे जुलै २०१६ पासुनचे वेतन व भत्ते आदा करणेत येवू नयेत, याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि सांख्यिकी व संगणक प्रमुख यांनी दक्षता घ्यावी, असे आदेश मा.महापालिका आयुक्त यांनी दिले आहेत.

वरीलप्रमाणे चर्चा होवून बैठक संपन्न झाली.

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत –** मा.संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडे पुढील तजविजीसाठी रवाना...